पुणे विद्यापीठ क्रीडा मंडळ
गणेशखिंड, पुणे –०७

दि. ०२ जुलै, २०१४

जा. क्र. विक्रीमं/क्रीडाशिबीर/चर्चासत्र/९३

प्रति,
मा. प्राचार्य,
संबंधित संलग्न महाविद्यालये,

**विषय: पुणे विद्यापीठ संलग्न वरिष्ठ महाविद्यालय शारीरिक शिक्षण संचालकांचे चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीर २०१४–१५ बाबत.**

महोदय/महोदया,

वरील विषयास अनुसरून आपणांस या पत्राद्वारे कळविण्यात येते कि, शैक्षणिक वर्ष २०१४–१५ मध्ये २९ वे शारीरिक शिक्षण संचालकांचे चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीर क्रीडा मंडळाच्या विद्यमाने व संगमनेर नगरपालिका, संगमनेर या महाविद्यालयाच्या सौजन्याने **गुरूवार दि. १७ जुलै ते शनिवार दि. १९ जुलै, २०१४ या कालावधीत मालपाणी रिसॉर्ट, संगमेनर** येथे आयोजित करण्यात येणार आहे.

या चर्चासत्रास पुणे विद्यापीठ संलग्न वरिष्ठ महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थामध्ये पूर्ण वेळ कार्यरत असलेल्या शारीरिक शिक्षण संचालकांना उपस्थित राहणे क्रमप्राप्त राहील. तसेच ज्या महाविद्यालयात व मान्याप्राप्त संस्थामध्ये महिला शारीरिक शिक्षण संचालक पूर्ण वेळ कार्यरत असतील संबंधितांनादेखील उपस्थित राहणे अनिवार्य राहिल.

या क्रीडा चर्चासत्रास व क्रीडा मार्गदर्शन शिबीरास आपल्या महाविद्यालयात पूर्ण वेळ कार्यरत असलेल्या शारीरिक शिक्षण संचालकांना खालील सूचना निर्देशित कराव्यात, ही विनंती.

अ) शारीरिक शिक्षण संचालक चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीरास उपस्थित राहण्याबद्दल संबंधित शारीरिक शिक्षण संचालकांचा दैनंदिन भत्ता, प्रवास खर्च व इतर अनुषांगिक खर्च हा नियमानुसार संबंधित महाविद्यालयास करावा लागेल. याबाबतची पूर्वपरवानगी मा.सहसंचालक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे – १ यांचेकडून मिळालेली आहे. त्यासंबंधिची कागदोपत्री करण्यात येणारी पुर्तता शिबीरा दरम्यान सर्व सहभागी शारीरिक शिक्षण संचालकांना देण्यात येईल.

ब) **चर्चासत्र व क्रीडा शिबीर मार्गदर्शनाचा कालावधी एकुण तीन दिवसांचा असेल. प्रत्येक शिबीरार्थीस नोंदणी शुल्क रू. ३५०/–(तीनशे पन्नास रूपये फक्त) प्रतिदिनी याप्रमाणे रू. १०५०/–(एक हजार पन्नास रूपये फक्त) व अनामत रक्कम म्हणून रू. १०००/– (एक हजार रूपये फक्त) एवढी रक्कम सहभागी होणाऱ्या शारीरिक शिक्षण संचालकाना गुरूवार दि. १७ जुलै, २०१४ रोजी**

**नावनोंदणी करते वेळी चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीर आयोजन करणाऱ्या महाविद्यालयाकडे रोख स्वरूपात जमा करणे क्रमप्राप्त राहील. सदर दोन्ही रक्कमेची रितसर पावती सहभागी शारीरिक शिक्षण संचालकांना देण्यात येईल. दि. १९ जुलै, २०१४ रोजी रू. १०००/— (एक हजार रूपये फक्त) अनामत रक्कमेची पावती सादर केल्यानंतर रू. १०००/— (एक हजार रूपये फक्त) पुन:श्च आपणांस देण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी.**

क) चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीरास उपस्थित राहणाऱ्या शारीरिक शिक्षण संचालकांची निवास, नास्ता, चहापान, भोजन व आवश्यक स्टेशनरी संयोजन महाविद्यालयाकडून देण्यात येईल.

ड) गुरूवार दि. १७ जुलै, २०१४ रोजी चर्चासत्राच्या ठिकाणी ठीक दुपारी १२.०० वाजेपर्यंत सर्व शारीरिक शिक्षण संचालकांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. प्रत्येक सहभागी शिबीरार्थीजवळ नाव नोंदणी करताना संबंधिताने आपण ज्या महाविद्यालयात शारीरिक शिक्षण संचालक म्हणून कार्यरत आहात व शिबीरास उपस्थित राहण्याबाबतचे **मा. प्राचार्यांचे संमतीपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.** गुरूवार दि. १७ जुलै, २०१४ रोजी दुपारी ठिक १.३० वा शिबीरार्थींना चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीराबाबत विशेष सूचना देण्यात येतील.

**टीप : सर्व शारीरिक शिक्षण संचालक (पुरूष/महिला) यांनी मालपाणी रिसॉर्ट, संगमनेर येथे उपस्थित राहावे.**

इ) **या चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीराच्या कालावधीत कोणत्याही शारीरिक शिक्षण संचालकास खाजगी कामाकरीता अन्य ठिकाणी जाण्याची कोणत्याही सवलत दिली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी**. गुरूवार दि. १७ जुलै, २०१४ ते शनिवार दि. १९ जुलै, २०१४ या कालावधीत होणाऱ्या शिबीराच्या प्रत्येक कार्यक्रमास उपस्थित राहणे अनिवार्य असेल तद्नंतरच संबंधित शिबीरार्थीस शिबीरास उपस्थितीबाबतचे प्रमाणपत्र व कार्यमुक्ती आदेश (Reliving Order) देण्यात येईल.

ई) चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीर उद्घाटन व समारोप दिनी प्रत्येक शारीरिक शिक्षण संचालकांकडे पूर्ण पांढरा गणवेश (पोशाख) असणे आवश्यक आहे. नसल्यास किमान पांढरा शर्ट/टी—शर्ट आवश्यक राहील. महिला शारीरिक शिक्षण संचालकांना पांढरा पंजाबी ड्रेस आवश्यक राहील.

या चर्चासत्रास व क्रीडा मार्गदर्शन शिबीराकरिता डॉ. अजय मापारी, डॉ. कश्मीरा सबनीस, डॉ. अरूण शिंदे, डॉ. सोपान कांगणे, प्रा. वसंत पवार, प्रा. रूपेश थोपटे, प्रा. राघव अष्टेकर, डॉ. कदम (स्ट्रेस मॅनेजमेंट, ट्रेनिंग प्रोग्रॅम, स्पोर्ट्स इंज्युरी व उपाय योजना, योगासने व योगक्रिया या विषयांवर व्याख्याने व प्रत्याक्षिक देणार आहे.)

<u>महत्त्वाच्या सूचना</u> :

१. शिबीरार्थींनी शिबीरास येताना मौल्यवान वस्तु अथवा रोख रक्कम ही स्वत:च्या जवाबदारी ठेवावी.
२. निवासाची व्यवस्था क्रीडा संचालकांना प्रत्येक रूममध्ये पाच व्यक्ती अशाप्रमाणे उपलब्ध करून देण्यात येईल.
३. गुरूवार दि. १७ जुलै, २०१४ रोजी सकाळी ठिक ११.०० ते दुपारी १२.०० या कालावधीत मालपाणी रिसॉर्ट, संगमनेर येथे स्वागत व नोंदणीकक्ष येथे उपस्थित राहावे.
४. ओळखपत्राकरीता प्रत्येक सहभागी शारिरीक शिक्षण संचालकांने **एक रिव्हेन्यू स्टॅम्प साईज फोटो (Revenue Stamp Size Photo)** सोबत आणावा.

कृपया सदरचे पत्र आपल्या महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालकांच्या निदर्शनास आणुन या शिबीरातील क्रीडा क्षेत्रातील आधुनिक बाबी आत्मसात करण्यासाठी अवश्य उपस्थित राहण्यास सांगावे.

धन्यवाद! सहकार्याची अपेक्षा!

कळावे,

आपला,

**संचालक,**
**विद्यापीठ क्रीडा मंडळ**

<u>प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी</u>:–

१) **मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सहायक**
२) **मा. कुलसचिव, पुणे विद्यापीठ**
३) **मा. वित्त व लेखाधिकारी, पुणे विद्यापीठ**
४) **मा. सदस्य, पुणे विद्यापीठ क्रीडा मंडळ**
५) **मा. जनसंपर्क अधिकारी, पुणे विद्यापीठ**
६) **मा. प्राचार्य, संगमनेर नगरपालिक महाविद्यालय, संगमनेर**
७) **मा. शा. शि. संचालक, संगमनेर नगरपालिक महाविद्यालय, संगमनेर**